
# भारतीय शेती व जागतिकीकरण




डॉ. मारोती कच्छवे

LRW LIBRARY
4180

4180

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ०१) | **हरित क्रांतीबद्दल भ्रमनिरास**<br>-डॉ. गंगाप्रसाद अग्रवाल | १-५ |
| ०२) | **ISSUE ON PROBLEMS OF AGRICULTURE IN INDIA**<br>-Dr. R.D. Deshmukh | ६-९ |
| ०३) | **शेती व्यवसाया समोरील आव्हाने**<br>डॉ. मारोती बालासाहेब भोसले | १०-१४ |
| ०४) | **शेती व्यवसायासमोरील प्रमुख समस्या : सालगडी**<br>डॉ. एम. डी. कच्छवे | १५-२२ |
| ०५) | **जागतिकीकरण व भारतीय शेती व्यवसाय समोरील आव्हाने आणि उपाययोजना**<br>प्रा. डॉ. बिरादार बी. एस. | २३-२९ |
| ०६) | **शेती व्यवसाया समोरील आव्हाने**<br>समाधान गोपिनाथराव कांबळे | ३०-३४ |
| ०७) | **भारतीय शेती व्यवसायासमोरील आव्हाने**<br>प्रा. सोमवंशी मुक्ता | ३५-४० |
| ०८) | **बळीराजाच्या आत्महत्या : कारणे व उपाय**<br>प्रा. मा. मा. कदम | ४१-४७ |
| ०९) | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या**<br>-स्वाती विकासराव कुर्मे | ४८-५२ |
| १०) | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या**<br>डॉ. जाधव राजेश्री अप्पाराव | ५३-५८ |
| ११) | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या**<br>प्रा. सुलोचना जाधव | ५२-६५ |
| १२) | **शाश्वत शेती - काळाची गरज**<br>प्रा. अशोक काकासाहेब जाधव | ६६-७१ |
| १३) | **मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय**<br>प्रा. श. द. परळकर | ७२-७७ |
| १४) | **आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या**<br>आडेराघो जी. एच. व रगडे सुभाष रामराव | ७८-८४ |
| १५) | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय**<br>प्रा. डॉ. प्रभाकर ब. वजीर | ८५-८९ |
| १६) | **शेतकऱ्याची आत्महत्या; एक गंभीर समस्या**<br>-कु. चौलवार भावना भागवतराव | ९०-९३ |
| १७) | **जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या**<br>-प्रा. नाथानी राणी जयरामदास, | ९४-९८ |
| १८) | **भारतीय शेतीचे स्वरुप व जागतिकीकरण**<br>डॉ. आर. एन. गंगासागरे | ९९-१०४ |
| १९) | **आर्थिक उन्नतीसाठी कृषी उद्योजकतेची गरज**<br>प्रा. डॉ. श्रीमती गंगासागर पी. वाय. | १०५-१११ |
| २०) | **शेती विषयक शासनाची ध्येय धोरणे**<br>प्रा. कानवटे एन. के. | ११२-११९ |
| २१) | **जागतिकीकरणाचा कृषी आधारीत उद्योगावरील परिणाम**<br>प्रा. पवार बी. एस. व प्रा. सय्यद व्ही. आय. | १२०-१२४ |


D

E

आहेत. त्यातही सध्या लेखहे राजकारण सुरूअसते.

**निष्कर्ष :-**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत भारतीय शेती आणि शेतकरी टिकवून ठेवायचा असेल तर शेती व्यवसायासमोरील आव्हानांचा गांभीर्याने विचार करून त्यावर केंद्रीय उपाययोजना कराव्या लागणार आहेत. नैसर्गिक संकटांपासून शेतीचे नुकसान टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचा कृती आराखडा तयार करून सक्षमपणे अंमल बजावणी करावी. शेतीस जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करण्यासाठी पशुपालनास प्रोत्साहन देवून गावोगावी दुग्धव्यवसाय स्थापन करून शेतकऱ्यास बँका, पतसंस्थामार्फत सुलभपणे वित्त पुरवठा करावा.

शेतकरी समाजाचाच घटक आहे. तो आपला अन्नदाता आहे.याची जाणीव ठेवून बँका,पतसंस्था, व्यापारी, शासकीय कर्मचाऱ्यांनी त्याच्या विषयीचा नकारार्थी दृष्टिकोन बदलून त्याची लुट कमी करून त्याचे शोषण थांबवावे. शसनाने रोजगार हमी सारख्या योजनेची कामं शेतीवर करून शेत मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यास द्यावा. शेती व्यवसायासाठी बीज, पाणी,खत,बी-बियाणे खात्रीचे, माफक दरात उपलब्ध करून द्यावेत. कृषी विद्यापीठांनी पुढाकार घेवून नवे, किफायतशीर बियाणे शेतकऱ्यास उपलब्ध करून द्यावेत. प्रत्येक गावात किमान एक शीतगृह बांधावे आणि ज्या भागात जे पिकते त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण करावेत. अशा प्रकारे शेती व्यवसाया समोरील आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी ह्या उपाययोजना केल्यातरच भारतीय शेती व्यवसाय जागतिकीकरणात टिकू शकेल. अन्यथा शेती समोरील आव्हानांमध्ये भर पडू शकते.

**संदर्भ ग्रंथसूची :-**


१. यादव आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या - मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
२. मुंढेकर श्रीराम : ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन - दिलीपराज प्रकाशन, पुणे
३. चंदनशिव भास्कर : माती आणि नाती - निर्मल प्रकाशन, नांदेड
४. चंदनशिव भास्कर : माती आणि मंथन - रजत प्रकाशन, औरंगाबाद
५. कुलकर्णी गो.म. : मराठी ग्रामीण साहित्य - मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
६. कोतापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध - मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे


• • •



# शेती व्यवसायासमोरील प्रमुख समस्या : सालगडी


**डॉ. एम. डी. कच्छवे**
सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ. जि. परभणी


**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. येथील ७० % जनता खेड्यापाड्यात राहते आणि तिचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेती मानवजातीच्या अस्तित्वासाठी आधारभूत असणारा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शेतीतून मिळणारे सर्व सजीवासाठीचे उपयुक्त घटक हे कोणत्या कारखान्यात तयार होत नाहीत किंवा एखाद्या उद्योगातून त्याचे उत्पादन करता येत नाही. अन्नधान्य उत्पादनासाठी शेतीशिवाय पर्याय नाही.

शेतकरी व शेतमजूर यांचे अतूट असे नाते आहे. सद्या शेतीची अवस्था बिकट आहे. शेती निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकत नाही, पिकलं तर विकत नाही. कधी अतिवृष्टीमुळे, कधी अल्प वृष्टीमुळे जमिन नापीकी एखाद्या रोगामुळे होते. त्यामुळे त्याची झळ शेतकऱ्यांना सोसावी लागते. त्याचा परिणाम शेतमजुरावरही होतो. शेतकरी हा एकटाच त्याच्या शेतीत राबून उत्पन्न काढू शकत नाही. त्याला साथ घ्यावी लागते. सालगडी, शेतमजुराची. शेतकऱ्याची जर नापीकीने किंवा अन्य आपत्तीमुळे दैन्यावस्था झाली तर त्याचा परिणाम शेतमजुरावर निश्चितच होतो.

शेती ही देशाचा आर्थिक कणा आहे. शेती निसर्गावर अवलंबून असल्याने शेतीस लहरी हवामानाचा फटका बसून त्याचा पिकाच्या उत्पादनावर परिणाम होतो. दुष्काळ हा येथील शेतीच्या प्रगतीआड येणारा व पाचवीला पुंजलेले संकट होय. शेती करण्यासाठी शेतमजुराची गरज असते. शेतीत काबाडकष्ट करण्यासाठी शेतकरी, त्याची घरधनीन व शेतमजुराच्या साह्याने राबराबतात. सगळी कामे यंत्राने होत नाहीत. काही कामासाठी माणसे लावावीच लागतात. शेतीत काम करण्यासाठी शेतमजुराची वाणवा आहे. परंतु शेतीतील कामासाठी सालगडी ठेवावे लागतात.

**उद्देश :**

सदर शोध प्रबंध पुढील उद्देश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे.

१) सालगडी व शेतमजुराची संकल्पना स्पष्ट करणे.

२) शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) शेती व्यवसायात सालगडी, शेतमजुरांचे महत्त्व अभ्यासणे.

४) शेतकऱ्यापुढील समस्यांचा अभ्यास करणे.

५) समस्येवर उपाय सूचविणे.

६) निष्कर्ष काढणे.

**अभ्यास पध्दती :**

सदर शोध प्रबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. दुय्यम माहितीत संदर्भ, दैनिक वर्तमान पत्रातील लेख, मासिके, इत्यादीचा आधार घेतलेला आहे. वरिल उद्दिष्ठ डोळयांसमोर ठेवून सामुग्री संकलन केले आहे.

**सालगडी :**

गुढी पाडवा हा भारतीय संस्कृतीनुसार वर्षाचा पहिला दिवस. हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक पवित्र मुहूर्त समजला जातो. कोणत्याही नव्या कामाची सुरुवात बळीराजा या मुहूर्तावर करतो. शेतीत वर्षभर काम करण्यासाठी हक्काचा, नियमित माणूस म्हणून सालगडी ठेवतो. गुढी पाडवा हा शेतकऱ्यांच्या उलाढालीचा असतो. या दिवशी सालगडी जून्या मालकास सोडचिठ्ठी व नव्या मालकाच्या सेवेत जाण्यास सालगडी प्रयत्न करतात. याच दिवशी सालगड्यात व शेतमालकात पैसे तसेच मालाची बोली केली जाते. पैशाच्या स्वरुपात वेतन, मजुरी त्याला दिली जाते. सालगड्यावर वर्षभर शेतीची, पशुधन सांभाळण्याची जबाबदारी दिली जाते. यासाठी सालगडी हा विश्वासू व मेहनती असावा ही प्रत्येक शेतकऱ्याची इच्छा असते. रुढी परंपरेनुसार १० पायली चंदीपोटी ज्वारी आणि पोळ्याच्या सणाला आपल्या बैलाची चांगली देखभाल करुन चांगली निगा राखली तर कपड्याचा आहेर केला जातो.

सालगड्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. सालगडी मिळत नसल्याने पर तालुका, जिल्हा, राज्यातून शोधावे लागत आहेत. सालगड्याला शेतात राहण्यासाठी त्यांच्या निवाऱ्याची सोय, इंधन व इतर त्यांच्या अटी पूर्ण कराव्या लागत आहेत. तीन ते पाच कि. ज्वारी चंदी म्हणून द्यावी लागते. साल ठरवताना ५० % रक्कम उचल म्हणून द्यावी लागते. एवढे करुनही वर्षभर नोकरी करील की नाही या बाबत साशंकता आहे. गावातील सालगडी



ठेवल्यास त्याच्या शेतीतील पेरणी, कोळपणीचे कामे फुकट करुन देऊन वर्षभर त्यांची मर्जी सांभाळण्यामध्ये शेतकरी परेशान आहेत. सालगडी मिळाला नाही तर काम कसं करायचं ही एक मोठी डोकेदुखी शेतकऱ्यासमोर उभी राहते.

**सालगड्याची नेमणूक व पगार :**

शेती व शेतकऱ्याचे नववर्ष गुढी पाडव्यापासून सुरु होते. पूर्वी सालगडी स्वतःहून शेतकऱ्याकडे कामासाठी यायचे तेव्हा पगारही रोख नव्हता. ठराविक गव्हू, ज्वारी आणि काही प्रमाणात रोख रक्कम अशा प्रकारचे वेतन ठरायचे. परंतु आता चित्र बदलले. सालगडी म्हणून काम करणाऱ्यांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. शेतीत वर्षभर तुटपुंज्या वेतनावर काम करण्यापेक्षा गावात, शहरात कंपनी किंवा कारखान्यात काम करण्याकडे सालगड्याचा कल दिसून येत आहे.

एका वर्षाच्या बोलीवर सालगड्याची नियूक्ती केली जाते. सालगडी मेहनत घेऊन शेतीची निगा राखतो. एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी शेतकऱ्यांच्या घरी काम करण्यास मागे पुढे पहात नाहीत. गुरे-ढोरे सांभाळावी लागतात.

**सालगड्याच्या मागण्या :**

- राहण्याची सोय करावी.
- भोजनाची सोय किंवा दोन-तीन पोते ज्वारी, गव्हू द्यावा.
- वर्षातून पोळा व दिवाळीला कपडे घ्यावेत.
- वर्षाच्या सुरुवातीस अर्धी उचल द्यावी व पुन्हा महीनेवारी वेतन द्यावे.
- आकाड्यावर न राहता गावातच राहण्यास परवानगी द्यावी.
- मोबाईलची सुविधा द्यावी.
- खाडे झालेले दिवस मोजणीत आणू नयेत.
- आजारी सुट्ट्या मिळत नाहीत.
- प्रत्यक्षात भरपूर काम करुनही पुरेशा आणि वेळेवर पैसा दिला जावा आणि मागताच क्षणी अडचणीला पैसे द्यावेत.
- आठवडी बाजाराच्या दिवशी मालकाचे उंबरवठे झिजवावे लागतात.

**सालगड्याबाबत शेतकऱ्याचे गाऱ्हाणे :**

- अनेकदा सालगडी वर्षाचा पगार घेऊन निम्म्या वर्षात दुसरे एखादे काम चांगले आल्यास नोकरी सोडून देतात.

- सालगडी दिलेला शब्द पाळत नाहीत.
- कामचुकारपणा जास्त करतात.
- मागण्या अवास्तव आहेत.
- मध्यस्थी माणसाचेही ऐकत नाहीत.
- ऐन सुगीच्या दिवसात नोकरी सोडून देतात.
- ओलीता खालील शेतीच्या कामासाठी नकार.

**शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती :**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने कधी कमी पावसाने तर कधी जास्त पावसाने कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ पडतो. बळीराजाला या दुष्काळाचा सामना करताना नाकेनऊ येतात. खर्च वाढतो. उत्पन्न कमी होते. अशा परिस्थितीत शेती करणे त्याला शक्य होत नाही. अशा वेळेस तो वर्षासाठी सालगडी ठेवतो परंतु तो आता परवडणारे राहीले नाही. शेतीमाल उत्पादनात असमतोल, पावसाचे घटते प्रमाण आणि सालगड्याच्या वार्षिक वेतनात ४५ ते ५० हजारापर्यंत झालेली वाढ यामुळे शेतकरी चिंताक्रांत झाला आहे.

शेती करण्यासाठी मोठा खटाटोप करावा लागतो त्यासाठी बैलजोडी, बी-बियाणे, मजुरी व प्रापंचीक लागणारा आर्थिक मोबदला झेपत नसल्यामुळे शेती करणे शेतमालकाला अवघड जात आहे. पूर्वी स्वतः शेतकरी पारंपारिक पद्धतीने शेती करीत असल्याने खर्च कमी येत होता. त्यामुळे शेतकरी समाधानी होता. सद्याच्या धावपळीच्या युगात कोणीही उसणवारी व्यवहार करण्यास तयार नाही. शुल्लक कामासाठी देखील खाजगी सावकार, पतपेढी, बँकेकडे गेल्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही. शेती करण्यासाठी शेती मालक वार्षिक भाड्याने व बटईने, वाट्याने, हिस्स्याने देत आहेत.

**शेतकऱ्यासमोरील समस्या :**

- शेतमजुरा अभावी, पावसाच्या अनियमीतपणामुळे व निष्काळजीपणामुळे तसेच आर्थिक दुर्बलतेमुळे बरीच शेती पडीक राहते. शेती जगली तर देश जगेल व माणसे जगतील. सध्याच्या महागाईच्या काळात सर्वसामान्य लोकांना जीवन जगणे मुश्कील झाले आहे.
- ग्रामीण भागाची स्थिती अत्यंत दयनीय आहे. शेतकरी, शेतमजुर, कामकरी, कष्टकरी खेडी सोडून शहराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात शेती कामासाठी मजुर मिळणे दुरापास्त झालेले आहे.



- वाढती महागाई, वाढलेली मजुरी, बी-बियाणे व खतासाठी करावी लागणारी कसरत, निसर्गाच्या लहरीपणामुळे झालेली बेभरवशाची शेती, शेतीच्या मशागतीसाठी लागणारा पैसा जुळवताना शेतकरी प्रचंड संकटात आला आहे. नापीकीमुळे गुंतवलेला पैसा सुद्धा निघत नाही.
- हरित क्रांतीच्या नावाखाली शेतकऱ्यांना अधिक उत्पादन, अधिक उत्पादनाची लालूच दाखविली आणि या देशाचा शेतकरी कायमचा पंगू झाला. शेतीसाठी लागणारी प्रत्येक गोष्ट त्याला विकत घेणे भाग पडते. त्यातून उत्पादन खर्च कमालीचा वाढला आणि त्या तुलनेत उत्पन्न मात्र घटले.
- सालगड्याचे वाढते सालदर आणि शेतीवर होणारा अन्य खर्च पाहून शेतकरी शेत बटाईने देण्यास पसंती देत आहेत.
- सालगड्याचे भाव गगनाला भिडले असल्यामुळे उत्पन्नापेक्षा शेतकऱ्यांचा सालगडी व मजुरीवरच खर्च जास्त होत आहे. कामाचा अनुभव आणि क्षमता पाहून सालगड्याचे दर ठरविण्यात येतात. ऊसतोड कामगार स्थलांतर होत असल्याने सालगडयाचा प्रश्न बिकट बनला आहे.
- शेतमजुरी करुन आपली चूल पेटविणाऱ्यांची तर फारच बिकट परिस्थिती आहे. दररोज रोजगार शेतीत मिळेल याची खात्री देता येत नाही. मजुराऐवजी तणनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेतमजुरांना मिळणाऱ्या रोजगारावरच गदा आली आहे.
- शेतीच्या कामासाठी पशुधन सांभाळण्याची कुवत व शेती मालकाचा विश्वास पात्र राहून कामे करणारा सालगडी आजघडीला मिळणे ग्रामीण भागात अवघड झाले आहे. त्यामुळे सालगडी शोधण्यासाठी कसरत करावी लागत आहे.
- ओलीता खालील क्षेत्रात वर्षभर शेतीची कामे असतात. सालगड्याशिवाय पर्याय नसतो. जास्तीचा पगार देऊनही शेतीत राबण्यास सालगडी तयार होत नसल्याने शेती व्यवसाय संकटात सापडला आहे.
- निसर्गाचा लहरीपणा, शासनाचे शेतकरी विरोधी धोरण यामुळे शेतकरी पूर्ण नागवला जात आहे. त्यातच दरवर्षी कमी जास्त पाऊस पडत असल्याने उत्पादनावर परिणाम होत असताना मजुरांचे वाढते वेतन कुठून द्यायचे असा प्रश्न आहे.
- शेतकऱ्यासाठी सरकार अनेक घोषणा करते मात्र त्याचा लाभ फारच कमी शेतकऱ्यांना मिळतो. एकीकडे वाढती महागाई आणि दुसरीकडे घसरणारे उत्पादन याचा मेळ घालायचा

कसा असा प्रश्न शेतकऱ्यासमोर छआड वासून उभा आहे.

- अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. पेरणीच्या वेळी खत रांगेत उभे राहूनही मिळत नाही. खतासाठी शेतकऱ्यांना काट्या खाव्या लागतात. संकटं शेतकऱ्यांची पाठ सोडत नाहीत.
- शेतीत मागच्या काही वर्षात लाईट, बोअर, मोटारी, ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, धरणे, मळणीयंत्र, काढणीयंत्र, पेरणीयंत्र, वेगवेगळी संकरीत बी-बियाणे, खते, औषधे, फवारे इ. आले. व्यापारी तत्त्वावर शेती केली जाऊ लागली. माणसांची कमीत कमी गरज भासू लागली आहे.
- शेतकरी हा एकटाच त्याच्या शेतीत राबून उत्पन्न काढू शकत नाही. त्याला साथ घ्यावी लागते सालगडी, शेतमजुरांची. जर नापीकीने, अन्य आपत्तीमुळे दैन्यावस्था निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शेतमजुरावर निश्चितच होतो.

**उपाय :**

- लहरी पर्जन्यमान, वेगवेगळ्या रोगांचा प्रादुर्भाव तसेच शेतमालाला वाजवीपेक्षा कमी मिळणारा दर यामुळे शेती करणे दिवसेंदिवस कठीण होऊ लागले आहे. तरीही हा व्यवसाय टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पारंपारिक पद्धतीच्या शेतीला अन्य व्यवसायांची जोड गरजेची ठरते. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा मिळेल.
- एकटा शेतकरी नैसर्गिक आपत्तीने खचून जाऊन तो हताश, निराश होतो व वेळप्रसंगी आपल्या जीवावर एखादा दुर्दैवी प्रसंग ओढवून घेतो. याचा विपरीत परिणाम त्यांच्या कुटुंबाला भोगावे लागतात. शेतकऱ्याची पोरं चटूर-फटूर कामासाठी शहरात खेटे घालताना दिसतात. अशा तरुणांना शहरी जीवन सुखावह वाटते. शेतीमालास किफायतशीर भाव नाही. त्यामुळे त्यांची मानसिकता शेती व्यवसायाबद्दल बदलली आहे. त्यासाठी युवकांना शेती व्यवसायात लक्ष केंद्रीत करण्यासाठी गट शेतीचा प्रयोग करणे गरजेचे आहे.
- कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार कारखाना व्यवस्थापकांना असतो. परंतु जगाचा पोशिंदा उपाशीपोटी काम करणाऱ्याला आपल्या उत्पादीत शेतीमालाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही. त्यासाठी त्यांना किंमत ठरवू दिली पाहिजे. नाही तर उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा.
- शेती जगविण्यासाठी तसेच शेतीच्या रक्षणासाठी, सुरक्षिततेसाठी सर्वांकडून प्रयत्न व्हायला पाहिजेत. शेतकऱ्यांना राष्ट्रीय प्राणी घोषीत करावे. तसेच शेतकऱ्यांना वृद्धापकाळात



८१८०

पेन्शन योजना सुरु करावी.

- शेतकरी व शेतमजूर यांचे अतूट नाते आहे. परंतु या व्यवसायात हिताच्या योजना आखताना शेतमजुरांना परके समजले जाते. शेतकरी हा एकटाच त्याच्या शेतीत राबून उत्पन्न काढू शकत नाही. त्याला महत्त्वाची साथ शेतमजुरांची असते. अधिक उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी सालगडी, शेतमजुरांचे निर्णय घेताना मत विचारात घ्यावे.

**निष्कर्ष :**

- शेतीतील कामाचे गुत्ते घेण्याचा नवा फंडा आता समोर येत आहे. एखाद्या कामाचे गुत्ते घेतल्यास त्या जोडप्याला रोज साडेतिनशे ते चारशे रुपये मिळतात त्यामुळे जास्तीत जास्त रोजगार मिळावा म्हणून सालाने न राहता मोकळेच राहत आहेत.
- ज्या शेतकऱ्याजवळ स्वतःच्या मालकीची थोडी जमीन असते पण त्या जमिनीतून मिळणारे उत्पन्न उपजीवीकेसाठी पुरेसे नसते असे शेतमजुर अन्य व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीवर काम करतात.
- निसर्गाची अवकृपा होत असल्यामुळे हाताशी आलेल्या. पिकाची नासाडी होत आहे त्यामुळे शेतात गुंतविलेला पैसा कसा काढावा या चिंतेत शेतकरी सापडलेला आहे.
- शेती कामासाठी मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना कुटुंबियांसमवेत शेती कामे करावी लागत आहेत. त्यामुळे बटईने शेती करण्याकडे कल आहे.
- सालगडी मिळत नसल्याने सीमावर्ती भागातून अथवा परराज्यातून सालगडी आणावा लागत आहे. हे सालगडी आणण्यासाठी शेतकऱ्यात चढाओढ आहे. त्यांच्या मागण्या आणि पगारी गगनाला भिडल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.
- ग्रामीण भागात मजुरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. शेतीच्या कामासाठी मजुर मिळणे प्रचंड त्रासदायक झालेले आहे. पेरणीसाठी, खुरपणी, पीक काढण्यासाठी मजुरावरच अवलंबून राहावे लागते.
- समुहातून शेतीचा विकास, समुहातून शेतकरी संपन्नता ही काळाची गरज आहे. समुह शेतीतून भरपूर उत्पादन वाढेल शेतकरी समृद्ध होतील. त्याची आर्थिक स्थिती सुधारेल. पडीक जमीन राहण्याचे प्रकार थांबतील. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सबल होतील.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. हरी मोकाशे - सालगडी मिळेल का सालगडी? दै. एकमत, दि. ०१.०४.२०११, पान क्र. ०५
२. सूर्यकुमार यन्नावार- सालगड्यांचा गंभीर प्रश्न, दै. एकमत, दि. ०१.०४.२०११ पान क्र. ०५
३. डॉ. स. श्री. मु. देसाई- कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन, पुणे पान क्र. २६९.
४. सुभाष ओईम्बे- दुर्लक्षित शेतमजुर, दै. देशोन्नती, दि. १४.०३.२०१०.
५. रमेश चिल्ले - कृषी व्यवसायासमोरील आव्हाने, दै. एकमत, दि. २६.१२.२०१०, पान क्र. ०३
६. धोंडीरामसिंह राजपूत - तरच देश जगेल, दै. लोकाशा, दि. १३.०४.२०१०
७. सालगड्याने शेतकऱ्याची झोपच उडविली, दै. सामना, दि. ०५.०३.२०११.
८. वैभव रेकुळगे- पाडव्याला औंदा मोबाईलबी पायजे, दै. सामना, दि. ०५.०३.२०११
९. सालगड्याच्या पगारीने मोडले शेतकऱ्यांचे कंबरडे, दै. एकमत, दि. १८.०३.२०११
१०. नवीन वर्षात सालगडी नेमण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ, दै. देशोन्नती, दि. १४.०३.२०११
११. ५० हजाराहून अधिक सालगड्याचा भाव, दै. लोकाशा, दि. ०७.०४.२०११, पान क्र. ०६
१२. श्री. तडखोलकर श्रीनिवास- सालगड्याच्या वाढत्या दराने घ्बटाईङ ला पसंती, दै. सकाळ, दि. १५.०५.२०११
१३. सालगड्याचे भाव वधारल्याने शेतकरी अडचणीत, दै. देशोन्नती, दि. २५.०४.२०११ परभणी, पान ४
१४. मजुरांचे भाव वधारल्याने शेती ठेक्याने, दै. सकाळ, दि. २९.०४.२०११ परभणी टुडे, पान २
१५. ग्रामीण भागातील मजुरांचे दर वाढले, दै. सामना, दि. ०७.०४.२०११ शेवटचे पान.


♦♦♦



# जागतिकीकरण व भारतीय शेती व्यवसाय समोरील आव्हाने आणि उपाययोजना


**प्रा. डॉ. बिरादार बी. एस.**
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग
श्री गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा, जि.परभणी


**प्रस्तावना : -**

जूलै १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव अर्थमंत्री आणि आजचे पंतप्रधान यांनी उदारीकरण खाजगीरण आणि जागतिकीकरण या नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारताच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्था आणि जागतिक बाजारपेठेशी जोडणे आणि अधिक स्पर्धात्मकता निर्माण करणे हा उद्देश होता. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राचा अंतर्भाव झाल्यामुळे भारतीय शेती पुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उद्देश जागतिकीकरणामुळे भारतीय शेती व्यवसायासमोरील आव्हाने आणि त्यावर उपाय योजना सूचवणे आहे. शोध निबंधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला असून विविध संदर्भग्रंथ, मासिके, परिसंवाद, चर्चासत्रे, वर्तमानपत्रे आणि अहवाल याचा वापर करण्यात आला आहे.

जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था आणि देशाची अर्थव्यवस्था यांच्या एकत्रीकरणची प्रक्रिया होय. जागतिकीकरणात वस्तू आणि सेवा यांचा मुक्त व्यापारावर भर दिला जाता. जागतिकीकरण म्हाजे वस्तू आणि सेवांच्या व्यापारात वेगाने होणारी वाढ आणि जागतिक बाजारपेठेची निर्मिती होय. जागतिक बँकेच्या मते सर्व वस्तूच्या आयातीवरील निबंध रद्द करणे, आयात कर कमीत कमी पातळीवर आणने, सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करणे आणि भांडवल, वस्तू व तंत्रज्ञान यांच्या गतिशीलतेत वाढ होण्यासाठी व्यापारातील अडथळे दूर करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

जागतिकीकरण ही एक दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. यात सरकारी नियंत्रणे हळूहळू कमी केले जातात. खाजगीकरणाला प्राधान्य दिले जाते, मुक्त बाजारपेठेचा स्विकार केला जातो. विदेशी, बहुराष्ट्रीय कंपन्यांना गुंतवणूकीसाठी मुक्त प्रवेश दिला जातो. पारदर्शी व खूल्या व्यापारास उत्तेजन दिले जाते आणि सर्व जग ही एक बाजारपेठ